**शपथेवर सरतपास श्री. देवाळकर अधिवक्ता गैरअर्जदारातर्फे :—**

४. शपथपत्र **नि.क्र. सि.—९** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दस्त यादी दाखल क.सि.१४ वर अनु.क्रं. १ ते ४ वर एफ. आर.आर.ऑडीट रिपोर्ट व चौकशी अहवालाच्या सत्यप्रती दाखल केलेल्या आहे. त्यास **नि. सि. १५ ते सि. १८** देण्यात आले.

पुढील सरतपास पुर्ण.

**उलटतपास श्री.जे.एम.पाटील विधिज्ञ अर्जदारातर्फे:—**

५. मी जिल्हा परीषद उच्च प्राथमीक शाळा चिंचोली खुर्द पंचायत समीती राजुरा येथे शिक्षक पदावर कार्यरत आहे. गैरअर्जदार संस्थेमध्ये मी सन,१९९५ साली सदस्य झालो. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेचे इलेक्शन झाल्यावर निवडुन आल्यानंतर निवडणुक अधिकारी निवडुन आल्याचे प्रमाणपत्र देतो. माझी गैरअर्जदार संस्थेच्या संचालक पदी नियुक्ती झाल्याबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदार संस्थेमंध्ये व्यवस्थापक हे पद आहे. त्या व्यवस्थापकास मुख्य कार्यकारी अधिका—याचे अधिकार संस्थेच्या उपविधिनुसार आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार संस्थेने मला या प्रकरणात साक्ष देण्यासाठी कोणतेही अधिकार पत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्ष देण्याचे अधिकारपत्र मी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अध्यक्ष म्हणुन गैरअर्जदार संस्थेमध्ये असल्याबाबत कोणताही लेखी पुरावा सादर केलेला नाही. माझी अध्यक्ष म्हणुन एप्रील,२०२५ मध्ये निवड झाली. त्यापुर्वी सत्यवान कुडसंगे हे अध्यक्ष होते.

६.  हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार हा नियुक्ती दि. १७/११/१९९८ पासुन दि.३१/०५/२०२० पर्यंत सलग सेवेमध्ये होता. आता मला नि.यु.११ वरील कार्यमुक्त आदेश व नि.यु.१२ वरील सेवा. निवृत्तीचा आदेश दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही आदेशामध्ये तक्रार कर्त्याच्या उपदानामध्ये काहीही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेच्या उपविधि नुसार कार्यरत कर्मचा—यांना सेवानियम लागु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेच्या उपविधीनुसार सेवानिवृत्त कर्मचा—याला सेवानिवृत्तीच्या वेळी उपदानाची रक्कम देण्याची तरतुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार सेवानिवृत्त झाला त्यावेळी उपदान निधी देण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या कारणामुळे तक्रारदाराला कोणत्या कारणामुळे उपदान निधी देण्यात आलेला नाही याचा उल्लेख नि.यु.११ व यु.१२ मध्ये नाही.

७.  आता मला नि.यु.१३ ते यु.१८ वरील अर्ज दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, वरील सर्व अर्ज तक्रारदाराने उपदानाची रक्कम मिळण्याकरीता संस्थेकडे दिलेले आहे. नि.यु.१९ वरील नोटीस मला दाखविली. सदर नोटीस संस्थेला प्राप्त झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोटीसला गैरअर्जदार संस्थेतर्फे उत्तर देण्यात आलेले नाही.

८.  आता मला नि.यु.२० वरील संस्थेचा मासीक सभा ठराव दाखविला.हे म्हणणे खरे आहे की, सदर ठराव प्रमाणे संस्थेच्या कर्मचा—याला ७ वा वेतन आयोग दि. १८/१०/२०२० च्या ठरावा नुसार लागु करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार वेतन आयोगाचे लाभ कर्मचा—याला देण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराला ७ व्या वेतन आयोगाचा लाभ देण्यात आलेला नाही. आता मला नि.यु.२१

व यु.२२ तक्ता दाखविण्यात आला त्यावर व्यवस्थापकाची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराला त्या तक्त्याप्रमाणे लाभ देणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार याचे सेव्हिंग खाते गैरअर्जदार संस्थेमधे आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराच्या सेव्हिंग खात्याला त्याला कार्यमुक्त केल्यानंतर ते पुर्ननियुक्तीच्या कालावधीतील मागील वेतन त्याच्या खात्यावर जमा केलेले आहे. सदर मागील वेतन मिळण्यासाठी अर्जदाराने नि.यु.२४ प्रमाणे विनंती अर्ज सादर केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर मागील वेतनाची रक्कम आजपर्यंत अर्जदाराला देण्यात आलेली नाही व ती तशीच अर्जदाराच्या खात्यावर जमा आहे.

९. हे मला माहिती नाही की, अर्जदाराची मागील वेतनाची रक्कम ही ७ व्या वेतनानुसार फरकाची न काढता जमा केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सेवानिवृत्तीच्या वेळी अर्जदाराला रू.४०४००/— मुळ वेतन देय होते. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराला ४,२४,२००/— एवढे उपदानाची रक्कम देय होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१/०५/२०२० पासुप गैरअर्जदार संस्था ही अर्जदाराची उपदानाची रक्कम रू.४,२४,२००/— स्वत: वापरत आहे व नफा कमावित आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार संस्थेकडे उपलब्ध असलेल्या फंडमधुन सभासदाला कर्ज वाटप करून त्यावर संस्था नफा कमावित आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदारा विरूध्द एफ.आय.आर.ही फेर लेखा परीक्षण झाल्यानंतर दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर एफ.आय.आर. कोरपना न्यायालयात फौजदारी केस प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराला सदर फौजदारी प्रकरणामधे न्यायालया मार्फत जबाबदार धरण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही

सक्षम अधिकारी किंवा प्राधिकरणाने अर्जदाराकडून रक्कम वसुल करण्याचे आदेश दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वरील एफ.आय.आर.मध्ये अर्जदारावर केलेले आरोपानुसार त्याला सेवेतुन कमी केले होते. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अर्जदाराला पुन्हा सलग सेवेमध्ये घेण्यात आले होते. हे मला माहिती नाही की, अर्जदारावर केलेले आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप हे बेकायदेशीर आहे असा निर्णय औद्यो. गिक न्यायालयाने दिलेला आहे. अर्जदारा विरूध्द केलेल्या आरोप संदंर्भात सहकार कायदयाचे कलम ८३ व ८८ प्रमाणे चौकशी झालेली आहे. सहकार कायदा कलम ८३ प्रमाणे व्यवथापक मंडळाची जबाबदारी निश्चित केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेच्या पदाधिकारी यांनी कलम ८८ अंतर्गत सुरू असलेले संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाने मागे घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर चौकशी प्रकणामधे अर्जदार हा सुध्दा एक पक्षकार होता. हे मला माहिती नाही की, सदर चौकशी प्रकरणात अर्जदाराने कादपत्राची मागणी केल्यानंतर व जिल्हा उपनिबंधकाने आदेश दिल्यानंतर सदर चौकशी प्रकरणात मागे घेण्यात आले होते. हे मला माहिती नाही की, चौकशी प्रक. रणात कागदपत्र देण्याचे टाळण्यासाठी व्यवस्थापक मंडळाने प्रकरण मागे घेतले.

११. हे म्हणणे खरे आहे की, नि.सि.१६ प्रमाणे ऑडिट प्रमाणे सहकार कायदा कलम ८३ अंतर्गत सहकार विभागाने चौकशी केली होती. वत्या आध ाारावर कलम ८८ अंतर्गत चौकशी प्रकरण दाखल झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, नित्र.१६ वरील ऑडीट रिर्पार्ट हा विवादित होता. हे म्हणणे खरे आहे की, आमचे अगोदरचे संचालक मंडळ व त्या अगोदरचे संचालक मंडळ सभासदावरती गैरअर्जदार संस्थेने वसुली प्रकरणे कलम ९१ सहकार कायदया अंतर्गत दाखल केलेले आहे.

१२.   हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार संस्थेला अर्जदाराकडून रू. ४,३८,९७३.५० पैसे घेणे आहे हे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या ठेवी आज रोजी सुध्दा गैरअर्जदार पतसंस्थेमधे आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराने कोणतीही अफरातफर केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी संस्थेचा अध्यक्ष असल्यामुळे गैरअर्जदार संस्थेच्या वतीने खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हा गैरअर्जदार संस्थेकडून ३३५०७६/— व्याजासह मिळण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास काही नाही.**

माझे समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर.

दि. १०.१२.२०२५.